REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २ फेब्रुवारी, १९४४ अंक ५

**फणसपोळी, आंबेपोळी**
किरकोळ व ठोक मिळेल.
द. ना. हेर्जीब, : : २० शुक्रवार, पुणें २.

**ए. बी. सी. कॉइल्स**
( डासांच्या उदबत्त्या )
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
**लायसॉफ**
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें १. —

—पुण्यांतील—
आदर्श निवासस्थान व भोजनालय
**छाया** लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

**पुना गेस्ट हाउस**
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ३,११,१०० |
| वसूल भांडवल | १,०६,६१५ |
| खेळतें भांडवल | १९,९०,००० |

डायरेक्टर्स—

| चेअरमन | व्हा. चेअरमन |
|---|---|
| रा. ग. रा. साठे, | रा. रा. दा. ग. बापट, |
| रा. श्री. म. जोशी | रा. जी. यू. चितळे |
| रा. एस. के. भावे | रा. एल्. आर. धडफळे |
| रा. डब्ल्यू. पी. वैद्य | रा. सी. टी. चितळे |

रा. एस. जी. केणी, व्यापारी मुंबई, खातेदारांतर्फे डायरेक्टर.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात. मुंबई, अहमदाबाद, बेळगांव, नगर, मद्रास व सोलापूर वर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर्स व इतर माहितीसाठी बँकेकडे चौकशी करावी—

जी. डी. जोगळेकर — बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिं. चितळे — मॅ. डायरेक्टर


## विविध माहिती

### विहिरींचा पाणीपुरवठा वाढविण्याची सरकारी योजना

मुंबई प्रांतांतील दुष्काळी भागांतील विहिरींची परिस्थिति सुधारण्यासाठी मुंबई सरकारनें ३½ लक्ष रुपयांची एक योजना आखली आहे. ह्या रकमेपैकीं निम्मा खर्च हिंदुस्थान सरकार देणार आहे. ही योजना पुरी होण्यास दोन वर्षे लागतील. २ हजार विहिरींचा पाणीपुरवठा सुधारून ५०० एकर उसासाठी व ७०० एकर धान्यासाठी पाणी उपलब्ध करणें व त्यापासून ६० हजार मण गूळ व ७० हजार मण धान्य अधिक उत्पादन होण्यास सहाय करणें, हा प्रस्तुत योजनेचा हेतु आहे.

### मुंबई शहरांतील टॅक्सींचा दर

मुंबई शहरांतील भाड्याच्या मोटारींचा दरमैली अधिकृत आकार पूर्वी सहा आणे होता, तो जानेवारी, १९४२ मध्यें आठ आणे करण्यांत आला. २० जानेवारी १९४४ पासून तो दहा आणे करण्यांत आला आहे. तथापि टॅक्सी ड्रायव्हर्स यूनियनचें तेवढ्यानें समाधान झालेलें नाहीं. हा दर आणखी वाढवून घेण्याचा प्रयत्न ते करणार आहेत.

### सिलोनमध्यें इटालियन युद्धकैद्यांचें आगमन

कित्येक इटालियन युद्धकैदी लष्करी कामाच्या कांहीं प्रारंभींच्या गोष्टी करण्यासाठी सिलोनमध्यें दाखल झाले आहेत. संयुक्त राष्ट्रांस विजय प्राप्त होईपर्यंत ते मदत करणार आहेत. जरा ते स्थिरस्थावर झाल्यावर त्यांना थोडीशी मोकळीक देण्यांत येईल.

### हिंदी कामगारांची संख्या वाढली

फॅक्टरी ॲक्ट लागू असलेल्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्या १९४१ सालीं २१ लक्ष, ५६ हजार होती ती १९४२ सालीं २२ लक्ष, ६१ हजार झाली.

### ब्रिटिश मोटारींच्या धंद्याचें युद्धोत्तर स्थान

युद्धापूर्वी ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल ५ लक्ष मोटार गाड्या तयार होत असत. अमेरिकेचें वार्षिक उत्पादन ५० लक्ष मोटार गाड्या एवढें होतें. युद्धानंतर अमेरिकन चढाओढीस तोंड देऊन व इतर देशांतील उत्पादनाचा अडथळा टाळून ब्रिटिश मोटारींची निर्गत कशी चालू राहील व वाढेल ह्यासंबंधीं खलबतें चालू आहेत. चीन व पूर्व आशिया ह्यांत हमरस्त्यांची प्रचंड आखणी करण्यांत येत आहे व तेथें मोटारगाड्या पूर्वीपेक्षा ज्यास्त खपतील, अशी अपेक्षा आहे.

### न्यूझीलंडचें औद्योगीकरण

युद्धामुळें न्यूझीलंडमध्यें उद्योगधंद्यांची वाढ झाली आहे, ती युद्धसमाप्तीनंतरहि चालू कशी राखतां येईल, ह्यासंबंधीं तेथील कारखानदारांच्या संघानें नुकतीच चर्चा केली. अधिक लोकांना किफायतशीर काम मिळावें, ह्यासाठी न्यूझीलंडमध्यें उद्योगधंदे वाढले पाहिजेत, असें संघाचे अध्यक्ष म्हणाले.

### युनायटेड किंगडम कमर्शिअल कॉर्पोरेशन

१९३९ मध्यें तुर्कस्तानच्या एकूण आयातीच्या ५% आयात ब्रिटिश मालाची होती; आतां तें प्रमाण ३०% झालें आहे. यु. किं. क. कॉर्पोरेशन तुर्कस्तानांत दरसाल ३० ते ४० लक्ष पौंडांची खरेदी करीत आहे. ५ कोटि पौंडांचा माल कॉर्पोरेशननें रशियाकडे पाठविला. उत्तर व पश्चिम आफ्रिकेशीं व्यापार वाढविण्याची योजना कॉर्पोरेशननें आखली आहे. ह्या उद्योगांत कांहीं नुकसान आलें तरी तें सोसण्याची कॉर्पोरेशनची तयारी असते.

### रेल्वे इंजनांची आयात

युद्धास प्रारंभ झाल्यानंतर १९३९ सालापासून हिंदुस्थानांत रेल्वे इंजनांची आयात बंद होती, ती १९४३ पासून थोड्या प्रमाणावर पुनः सुरू झाली. परंतु, ह्या आयातीचा प्रवाह अद्याप मर्यादितच आहे.

### हिंदी रेल्वेजवरील युद्धकालीन ताण

हिंदी रेल्वेजवरील लष्करी वहातूक कमालीची वाढली आहे. १९३८-३९ मध्यें ह्या वहातुकीचा आकडा ५ लक्ष टन होता, तो १९४२-४३ मध्यें १ कोटि, २९ लक्ष टन झाला. युद्धापूर्वी दरसाल ३०० ते ३५० खास लष्करी गाड्या सुटत असत; आतां दर महिन्याला ह्यापेक्षा ज्यास्त स्पेशल्स सुटतात. ह्या गाड्यांचा प्रवासहि ८०० ते १००० मैल इतका दीर्घ असतो. बिनलष्करी वहातुकींत धान्याच्या वहातुकीस प्राधान्य आहे. १९४२-४३ सालीं २५ लक्ष टन धान्याची हिंदी रेल्वेजनीं वहातूक केली.

### रशिया-पोलंड बांच्यांत अमेरिकन मध्यस्तीस नकार

रशिया व पोलंड ह्यांचेमधील बांध्यांत मध्यस्ती करण्याची अमेरिकेनें तयारी दर्शविली होती, परंतु रशियानें अमेरिकेच्या चांगुलपणाबद्दल आभार मानून अद्याप अशा मध्यस्तीची आवश्यकता निर्माण झालेली नाहीं असें कळविलें.

### आगीमुळें १८ लक्ष रुपयांचें नुकसान

मुंबई येथील क्राउन स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग मिल्सच्या कपाशीच्या गोडाउनला नुकतीच आग लागली, तीमुळें १८ लक्ष रुपयांची नुकसानी झाली.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... ३४ | युरोपांतील आघाड्यांवर जर्मनीची पीछेहाट—बाहेरील औद्योगिक तज्ज्ञांच्या नेमणुका—ब्रिटिश साम्राज्य परिषद्—इंडियन रिअल एस्टेट कॉर्पोरेशन लि.—ज्वारीचें व बाजरीचें पीक | |
| २ आर्थिक अभिवृद्धीची योजना | ... ३५ | | |
| ३ हिंदुस्थानांतील दुष्काळ-निवारणार्थ मदत | ... ३६ | | |
| ४ विचित्र मनोवृत्ति व विचारसरणी | ... ३६ | | |
| ५ स्फुट विचार | ३७ | ६ आर्थिक नियोजन | ... ३९ |

# अर्थ

बुधवार, ता. २ फेब्रुवारी, १९४४

## आर्थिक अभिवृद्धीची योजना

हिंदुस्थानांतील लोकांचें दारिद्र्य, निरक्षरता, रोगटपणा, अल्पायुषीपणा इत्यादि गोष्टींमुळें ह्या देशास जगांत निकृष्टतेचें स्थान प्राप्त झालें आहे. त्याच बरोबर युद्धोत्तर काळांत करावयाच्या आर्थिक पुनर्घटनेच्या योजनांची सर्वत्र भाषा बोलली जात आहे. अशा योजनेचें कोठें विशेष अगत्य असेल, तर तें हिंदुस्थानांत आहे. ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सकारच्या विद्यमानें कांहीं योजनांचा विचार चालू आहे. हिंदी उद्योगधंद्यांशीं प्रत्यक्ष संबंध असणाऱ्या लोकांच्या पुढाऱ्यांस देशाच्या आर्थिक अभिवृद्धीविषयीं कळकळ वाटणें स्वाभाविक असून आणि त्या संबंधांतल्या स्वतःच्या कल्पना योजनेच्या स्वरूपांत जनतेपुढें मांडणें आपलें कर्तव्य आहे असें वाटलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास प्रभृति औद्योगिक पुढाऱ्यांनीं प्रसिद्ध केलेल्या योजनेच्या मुळाशीं हाच विचार आहे. कित्येकांनीं तिचें स्वागत केलें आहे, ह्याचें कारण तिच्या योगानें आर्थिक पुनर्घटनेच्या चर्चेस चालना मिळणार आहे, हें आहे. योजना भरमसाट, एककल्ली, अपुरी आहे अशा आशयाचींहि विविध मतें व्यक्त करण्यांत आलीं आहेत. परंतु योजनेच्या कर्त्यांनीं स्वतःच तिच्या मर्यादा काय आहेत हें स्पष्ट केलें आहे. आर्थिक अभिवृद्धी कशी घडवून आणावी, योजनेचें नेतृत्व कोणाकडे असावें व त्यांनीं कोणतीं साधनें वापरावीं, त्याचप्रमाणें वाढणाऱ्या राष्ट्रीय संपत्तीची वांटणी कोणत्या पद्धतीनें व तत्त्वावर व्हावी आणि राष्ट्रीय सरकाराचा योजनेच्या अंमलबजावणीशीं कोणता संबंध असावा वगैरे जिव्हाळ्याच्या बाबींचा विचार आपण अजून करीत आहों असें त्यांनीं म्हटलें आहे. देशाच्या आर्थिक अभिवृद्धीची दिशा व उद्देश ह्यांचें स्थूलमानानें दिग्दर्शन करावें एवढेंच तूर्त अभिप्रेत आहे असें त्यांनीं प्रस्तावनेदाखल सांगून टाकलें आहे.

योजनेच्या कर्त्यांच्या मतानें कांहीं बाबी मूलभूत स्वरूपाच्या आहेत. युद्धसमाप्तीनंतर लवकर ह्या देशांत आर्थिक प्रश्नांचा अखेरचा निकाल लावण्याचा अधिकार असलेली मध्यवर्ती राष्ट्रीय सत्ता स्थापन होईल आणि प्रांतिक व संस्थानी सरकारांत राज्यकारभार वाटला गेला तरी आर्थिक राष्ट्रीय धोरणांत एकसूत्रीपणा आणण्याचा अधिकार त्या सत्तेच्या हातीं राहील असें योजनेंत गृहीत धरण्यांत आलें आहे. हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळीं आर्थिक तत्वें व धोरणें अंमलांत आणलीं गेल्यास देशाच्या उन्नतीची आशा करणें अशक्य आहे असा त्याचा अर्थ आहे. भिन्न भिन्न हितसंबंधांच्या प्रतिनिधींची एक समिती नेमण्यांत यावी आणि तिनें आर्थिक पुनर्घटनेची व्यापक व तपशीलवार योजना तयार करावी आणि ती अंमलांत आणण्याचें काम मध्यवर्ती सरकारच्या नेतृत्वाखालीं एका वरिष्ठ आर्थिक समितीकडे सोपवलें जावें अशी सूचना सर पुरुषोत्तमदास प्रभृतींनीं केली आहे. हिंदी जनतेची वार्षिक प्राप्ति सध्याच्या दुप्पट व्हावी हें प्रस्तुत योजनेचें मुख्य उद्दिष्ट आहे आणि तें पंधरा वर्षांच्या अवधींत साध्य केलें जावयाचें आहे. ह्या काळांत देशांतलें शेती, उद्योगधंदे, व्यापार इत्यादींचें उत्पन्न वाढेल, पण त्या बरोबर लोकसंख्येंतहि भर पडेल आणि दर माणशीं सरासरीची प्राप्ति त्या मानानें प्रमाणशीर व्हावी लागेल ही गोष्ट येथें हिशेबांत धरण्यांत आली आहे. शेतीचें उत्पन्न दुपटीनें आणि उद्योगधंद्यांचें पाच पटीनें वाढावें अशा अपेक्षेनें अभिवृद्धीच्या योजनेची रचना करण्यांत आली आहे. देशाचे धंदे अत्यंत मागसलेल्या अवस्थेंत असल्यानें हें विशिष्ट प्रमाण निश्चित केलेलें आहे. योजना पंधरा वर्षांनीं पूर्ण झाल्यावरहि हिंदुस्थान देश कृषिप्रधान राहील हें उघड आहे, पण त्यांत शेती व धंदे ह्यांचें परस्पर प्रमाण सध्याच्या मानानें अधिक समाधानकारक होईल. योजना चालू होईल तेव्हां प्रारंभीं यंत्रें व प्रेरक शक्ती ह्यांच्या उत्पादनास प्राधान्य देण्यांत येईल. यंत्रसामुग्रीसारख्या मूलभूत साधनांच्या अभावामुळें हिंदुस्थानास लढाऊ सामुग्री व युद्ध काळांत आवश्यक असलेला माल इच्छा व मागणी ह्यांस अनुसरून बनवतां आला नाहीं ह्या अनुभवावरून हा कार्यक्रम आखण्यांत आला आहे. तथापि, यंत्रसामुग्री, वीज वगैरेंचें उत्पादन जोरानें हातीं घेतलें जाईल तेव्हां जनतेस नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या वस्तूंचा तुटवडा पडूं नये म्हणून मध्यम व लहान प्रमाणावरील धंद्यांनीं ह्या प्रकारचा माल बनविला पाहिजे असें योजकांनीं सुचवलें आहे. त्यांची योजना अंमलांत आणावयाची म्हटल्यास तिच्या मार्गांत येणाऱ्या अडचणींची त्यांस जाणीव असून त्यांनीं त्यांचा निर्देश केला आहे. प्रारंभीच्या वर्षांत जनतेस गैरसोयी सोसाव्या लागतील; राजकीय स्वरूपाच्या मतभेदांमुळें योजनेच्या अंमलबजावणीचें यंत्र उभारलें जाणें कठिण होईल; आंतरराष्ट्रीय परिस्थिति प्रतिकूल होईल. ह्या प्रकारचे अडथळे आल्यास योजनेची अंमलबजावणी लांबण्याचा संभव आहे. तिच्या पूर्वतयारीसहि चार पांच वर्षें लागतील. तथापि, आपल्या कल्पना स्थूलमानानें हिंदी जनतेस पसंत पडल्यास विधायक कृति अडचणींमुळें स्थगित होणार नाहीं असा विश्वास योजनाकर्त्यांस वाटत आहे. दहा हजार कोटि रुपये योजनेप्रीत्यर्थ लागतील ह्या एका हिशेबानेंच कित्येक लोक बुजून जातील. पण हिंदी राष्ट्रानें मनाचा पक्का निर्धार केल्यास हा पैसा उभारणें अशक्य नाहीं असें त्यांस खात्रीलायक वाटत आहे.

---

### रेल्वे इंजनांस दररोज १६ हजार टन कोळसा

एल. एम. एस. ह्या ब्रिटिश रेल्वेच्या २७,००० इंजनांत दररोज १६,००० टन कोळसा जळतो.

### हिंदुस्थानांतील दुष्काळ निवारणास संयुक्त राष्ट्रांची मदत

युद्धामुळें उध्वस्त व व्यथित झालेल्या देशांतील लोकांस अन्नपुरवठा करून पुन्हा सुस्थितीवर आणून ठेवण्याचे उद्देशानें मित्रराष्ट्रें व त्यांचे सहकारी ह्यांच्या प्रतिनिधींनीं अमेरिकेंत गेल्या वर्षी एकत्र येऊन चर्चा केली आणि ह्या परिषदेंत निश्चित झालेल्या धोरणास मूर्तस्वरूप देण्यासाठी एक कार्यकारी मंडळ नेमलें. बंगालमध्यें आलेल्या दुष्काळाच्या आपत्तीचें निवारण ह्या कार्याच्या कक्षेमध्यें येतें किंवा नाहीं ह्याविषयीं शंका होती आणि प्रत्यक्ष शत्रुकृत आपत्तींचाच त्यांत समावेश होतो अशी एक कल्पना होती. ही शंकास्पद स्थिति दूर होण्याच्या मार्गांत आतां आहे, असें अमेरिकेच्या कॉंग्रेसमध्यें आपत्ती निवारणासाठी द्यावयाच्या रकमेच्या मंजूरीचा कायदा विचारासाठी पुढें आला असतां त्यांत झालेल्या दुरुस्तीवरून स्पष्ट होतें. उध्वस्त व व्यथित झालेल्या देशांसाठी अमेरिकेनें १३५ कोटि डॉलर्सपर्यंत खर्च करण्यास हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हसनें मान्यता दिली आहे आणि तसें करतांना अशी व्यवस्था ग्रथित केली आहे कीं मित्रराष्ट्रांच्या युद्धकार्यास महत्त्वाचा असलेला एखादा देश दुष्काळ किंवा रोग ह्यांनीं पीडित झाल्यास त्यास सहाय देण्यासाठी मित्रराष्ट्रांनीं उभ्या केलेल्या दुःखनिवारण फंडाचा उपयोग केला जावा. ह्या कायद्यांत व विशेषतः त्याच्या दुरुस्तींत हिंदुस्थानचा प्रत्यक्ष नामनिर्देश नाहीं. तथापि, हा देश मित्रराष्ट्रांच्या एशियांतील आघाडीचें लढाऊ मूळस्थान झाला असल्यानें बंगाल आणि आसाममधील व्यथित लोकांस मदत देणें हें दुःखनिवारण व्यवस्थेच्या कक्षेंत येईल असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. अमेरिकन कॉंग्रेसची सूचना मित्रराष्ट्रांच्या परिषदेंत नेमल्या गेलेल्या कार्यकारी समितीपुढें येईल तेव्हां तिला मान्यता मिळून हिंदुस्थानच्या बाबतींत तिची अंमलबजावणी केली जाईल असें वाटतें. हिंदुस्थानच्या दृष्टीनें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट होईल.


**THE BANK OF MAHARASHTRA, Ltd.**

## Notice of Special Resolution.

Notice is hereby given that the following Resolution amending the Articles of Association of the Bank will be moved as a Special Resolution at the Ordinary General Meeting of the Shareholders to be held on 27-2-1944 at 4 P. M. at the Registered Office of the Bank, Kakakuwa Mansion, Laxmi Road, Poona City.

**Resolution :—**

(A) "That in Article 109 the words 'for a fixed term which shall not exceed five years at a time' shall be substituted in place of 'either for a fixed term or without any limitation as to the period for which he or they is or are to hold such office.'"

(B) "That in Article 80 the figure '100' be substituted in place of '25'."

POONA CITY, 28th January, 1944 — By Order of the Board, **C. V. JOAG,** *Manager.*


### विचित्र मनोवृत्ति व विचारसरणी !

मिस कॉर्नेलिया सोराबजी ह्या बाईंचें लंडनच्या टाइम्समध्यें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे, त्यांत त्यांनीं बंगाली लोकांच्या उपासमारीसंबंधीं खालीलप्रमाणें कांहीं मासलेवाइक विधानें केलीं आहेत. "बंगालचें मुख्य पीक तांदूळ हें आहे. तेथील लोक उपाशी मरतील पण बाहेरून आणलेला गहूं खाणार नाहींत, इतकेंच नव्हे तर बंगालमध्यें न पिकलेला तांदूळ हि खाण्यास उपाशी बंगाली लोक तयार नसतात ! बाहेरून येणारा तांदूळ चांगला असला तरी तो खाण्याची त्यांची तयारी नाहीं ! अन्नछत्रांत देण्यांत येणारें अन्न खाण्यास उपाशी लोकांना प्रवृत्त करण्यांत सहानुभूति व युक्ति ह्यांस यश येईल, अशी आशा करण्यापलीकडे जास्त काय शक्य आहे ! त्यामुळें "अन्नछत्रांत जेवलेल्यां" ची नवी स्थानिक जात निर्माण होईल !"

मिस सोराबजी ह्यांचीं हीं विधानें कितपत वस्तुस्थितिनिदर्शक आहेत, हें ब्रिटिश जनतेपेक्षा हिंदी जनतेस अधिक चांगल्याप्रकारें लक्षांत येईल, हें उघड आहे.


**THE BANK OF MAHARASHTRA, Ltd.**

## NOTICE.

Notice is hereby given that the Ninth Ordinary General Meeting of the Shareholders of the Bank of Maharashtra, Ltd., will be held at the Registered Office of the Bank, Kakakuwa Mansion, Laxmi Road, Poona City, on Sunday the 27th day of February 1944, at 4 P. M. to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account, and the reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December 1943.

*(2) To declare a Dividend.

(3) To elect four Directors in places of the retiring Directors and to elect a Director in the place of one who ceases to be a Director, these being eligible for re-election and election respectively.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To pass a Special Resolution amending Articles 109 and 80 as per accompanying special notice.

(6) To transact such other business as may be allowed by the Chairman.

POONA CITY, 28th January, 1944. — By Order of the Board, **C. V. JOAG,** *Manager.*

*N. B.*—The transfer books of the Bank will be closed from the 25th day of February, 1944 to the 3rd of March 1944 both days inclusive.

* The Dividend when sanctioned will be payable on and after Friday the 17th of March, 1944 and the Dividend Warrants will be posted to the registered addresses of the shareholders. Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.

## स्फुट विचार

### युरोपांतील आघाड्यांवर जर्मनीची पीछेहाट

युरोपांतील पूर्व आघाडीवर रशियन सेनेची सारखी प्रगति चालली आहे आणि जर्मनीस एक दिवसहि स्वास्थ्य मिळालें नाहीं एवढेंच नाहीं तर प्रत्येक ठिकाणीं जबर नुकसान सोसून मागें हाटणें भाग पडत आहे. उत्तरेकडे लेनिनग्राडच्या विभागांत रशियानें चढाईस प्रारंभ करून शत्रूच्या मान्याच्या जागा हस्तगत केल्या आहेत. त्याचबरोबरं आघाडीच्या दक्षिण टोकापाशी कर्चच्या द्वीपकल्पांत रशियन फौजा शत्रूवर चाल करून जात आहेत. ह्या रीतीनें हिवाळ्यांत स्वस्थ रहाण्याऐवजीं रशियानें जर्मनीस पश्चिमेकडे ढकलीत ढकलीत पोलंडमध्यें पिटाळलें असून आघाडीच्या इतर भागांवर पद्धतशीर हल्ले चढवण्याचें धोरण अबाधित चालू ठेवलें आहे. युरोपच्या पश्चिम भागांत इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या संयुक्त फौजा दुसरी व तिसरी आघाडी कोठें उघडणार ह्याचा अंदाज न लागल्यामुळें हिटलरची डोकेदुखी वाढली आहे. पश्चिम जर्मनीमधलीं बर्लिन आदिकरून प्रमुख औद्योगिक शहरें जमीनदोस्त व बेचिराख झालीं आहेत. दुसऱ्या व तिसऱ्या आघाडींची मित्रराष्ट्रांची तयारी अव्यत चालली असल्यानें पश्चिम युरोपाच्या बचावाची व्यवस्था करण्याची हिटलरनें धडपड चालवली आहे. इटलीमध्यें अमेरिकन व ब्रिटिश सैन्यें हळुहळु पण निश्चयानें रोमच्या बाजूनें पुढें सरकत आहेत. येथें शत्रू-प्रतिकाराची शिकस्त करीत आहे तरी मित्र राष्ट्रांच्या जबर लढाऊ सामर्थ्यापुढें त्यास माघार घ्यावीच लागत आहे.

---

### बाहेरील औद्योगिक तज्ञांच्या नेमणुका

आधुनिक यांत्रिक कला आणि औद्योगिक कार्यपद्धती ह्यांचें ज्ञान व अनुभव ह्यांचा हिंदुस्थानांतील त्यांच्या नावीन्यपूर्ण आगमनामुळें, अभाव नाहीं तरी तुटवडा कांहीं वर्षामागें हिंदवासीयांमध्यें होता ह्यांत नवल नाहीं. तथापि, गेल्या पांच पंचवीस वर्षांत स्वदेशी उद्योगधंद्यांच्या प्रगतीच्या ओघांत हिंदी औद्योगिक व यांत्रिक तज्ञांची संख्या वाढत चालली आहे. ह्या कारणानें मोठमोठाल्या उद्योगधंद्यांत हिंदी कार्यकर्त्यांच्या नेमणुकी केल्या जाणें अपेक्षित व आवश्यक आहे. औद्योगिक कारभाराची जबाबदारी हिंदी लोक जसजशी उचलींत जातील, तसतसें हिंदी धंद्यांच्या उन्नतीस अधिकाधिक उत्तेजन मिळत जाईल. सध्याच्या युद्धपरिस्थितींत हिंदी कारखानदारींचें महत्त्वाचें सहाय लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनांत होत आहे आणि ह्यासंबंधांत हिंदी धंदेवाल्यांची कार्यक्षमता सिद्ध झाली आहे. राज्यकारभारांत हिंदी लोकांस जबाबदारीचें स्थान दिल्याचा परिणाम अनुकूल असा झालेला आहे ह्यांत आतां शंका नाहीं. त्याचप्रमाणें सरकारी नोकऱ्यांत हिंदी लोक मोठ्या जबाबदारीचीं कामें समाधानकारक रीतीनें करीत आहेत. अशा स्थितींत लायक यांत्रिक तज्ञ उपलब्ध असतांना जबाबदारीच्या औद्योगिक जागांवर बाहेरच्या लोकांच्या नेमणुका झाल्या म्हणजे त्यांचेविरुद्ध धंदेवाल्यांच्या मंडळींनीं तक्रार करावी हें साहजिक आहे. हिंदुस्थानांत पोलादाचा व कोळशाचा पुरवठा ह्यांचेसंबंधांत व्यवस्था पहाण्यासाठी ब्रिटिश व अमेरिकन तज्ञ नुकतेच नेमण्यांत आले आहेत, त्यांचे बाबतींत फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ह्या संस्थेच्या कार्यकारी समितीनें आपली नापसंती हिंदुस्थान सरकारास कळवली आहे. आपापल्या कार्यास वरील लोक सर्वस्वी लायक असतील आणि ते तसे आहेत म्हणूनच त्यांच्या नेमणुका झाल्या आहेत. असें उत्तर सरकारकडून मिळेल हें ठरलेलें आहे. परंतु येथें प्रश्न आहे तो त्यांच्या योग्यतेचे तज्ञ हिंदुस्थानांत उपलब्ध नव्हते काय ? असा आहे. उच्च दर्जाच्या जबाबदारीच्या जागा हिंदी लोकांस द्यावयाच्या सरकारी धोरणाच्या विरुद्ध प्रस्तुत नेमणुका आहेत असें फेडरेशननें म्हटलें आहे. परंतु नेमणुका तर होऊन गेल्या आणि आतां हें केवळ मतप्रदर्शन आहे. तथापि, गप्प बसण्यापेक्षा अभिप्राय निर्भीडपणानें व्यक्त करणें बरें.

---

### ब्रिटिश साम्राज्य परिषद

ग्रेट ब्रिटनचे मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं ब्रिटिश साम्राज्यांतील स्वतंत्र देशांच्या म्हणजे डोमिनिअन्सच्या मुख्य प्रधानांची परिषद चालू वर्षांत लंडन येथें भरवण्याचें ठरवलें आहे. अशी परिषद् १९३७ सालांत भरली होती आणि युद्ध चालू असतांना डोमिनिअन्सच्या मुख्य प्रधानांस आपापले देश सोडून लंडनला चर्चेसाठी जातां येईल किंवा कसें ह्याची शंका असल्यानें तिचें अधिवेशन आतांपर्यंत होऊं शकलें नाहीं. परंतु ह्या संबंधांतली परिस्थिति अनुकूल असल्याकारणानें साम्राज्य परिषद् यंदा भरवण्यास हरकत नाहीं असें मि. चर्चिल ह्यांस वाटत आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या हिताचे प्रश्न मधून मधून उपस्थित होतात आणि त्यांचा विचार करून सर्वांस पसंत पडेल असें धोरण साम्राज्य परिषदेंत निश्चित केलें जातें. इंग्लंड व डोमिनिअन्स ह्यांचे व्यापार, चलन, उद्योगधंदे, परराष्ट्रांशीं व्यापारी व इतर करार, इत्यादि बाबतींत परस्पर संबंध कसे असावे, ब्रिटिश साम्राज्याच्या मजबुतीसाठी कोणते उपाय योजिले जावे, वगैरे विषयांची चर्चा युद्धपरिस्थितींत व युद्धोत्तरकाळासाठी नेहमीपेक्षा अधिक महत्त्वाची वाटत असल्यास त्यांत नवल नाहीं. हिंदुस्थानास डोमिनिअनचा दर्जा नसल्यामुळें साम्राज्य परिषदेंत निराळें स्थान नाहीं हें उघड आहे. हिंदी प्रतिनिधीची जागा हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ स्टेट भरून काढतील. इंग्लंडमधील युद्ध कौन्सिलवर हिंदुस्थानचे प्रतिनिधी ब्रिटिश सरकारनें नेमले आहेत, ते साम्राज्य परिषदेचे वेळीं लंडनमध्यें असतील आणि जरूर तेव्हां त्यांचा सल्ला घेणें सोयीचें होईल असें म्हटलें जात आहे त्याचा अर्थ हिंदुस्थानच्या सध्याच्या राज्यघटनाविषयक दर्जावरून उघड होत आहे. डोमिनिअन्सच्या बरोबरीचें स्थान हिंदुस्थानास युद्धानंतर देण्याचें इंग्लंडनें उदक सोडलें आहे. तेव्हां होऊं घातलेल्या साम्राज्य परिषदेंत ह्या देशाचे लोकनियुक्त प्रतिनिधी घेण्यांत आल्यास तें मुत्सद्देगिरीचें व हितावह धोरण ठरेल. ह्या परिषदेंत हिंदुस्थानच्या हिताशी संबंध येणाऱ्या महत्वाच्या प्रश्नांची चर्चा होईल. असें असल्यानें ह्या देशाचें मत स्वतंत्रपणानें तेथें व्यक्त केलें जाणें योग्य होणार आहे. साम्राज्यपरिषदेंत हिंदुस्थानचें सहकारित्व हा देश, इंग्लंड व डोमिनिअन्स ह्या सर्वांचेच दृष्टीनें हितावह आणि उपकारक होणार आहे.

---

### दि इंडियन रिअल इस्टेट कार्पोरेशन लि., पुणें

वरील कंपनीस कामास प्रारंभ करण्याचें सर्टिफिकेट १७ नोव्हेंबर १९४१ रोजीं मिळालें. खरेदीनें अथवा दीर्घ मुदतीनें जमिनी घेऊन त्या सुधारून वसाहती स्थापणें; इमारती, रस्ते,

ड्रेनेज इत्यादींच्या बांधणीचीं कंत्राटी कामें घेणें; इत्यादि कंपनीचे प्रमुख उद्देश आहेत. मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, जळगांव, बेळगांव, अहमदनगर, पुणें, सांगली, इत्यादि ठिकाणीं नव्या बिऱ्हाडांच्या बांधणीस पुष्कळच वाव आहे. हप्तेबंदीच्या पद्धतीनेंहि घरें बांधून विकण्याचा कंपनीचा उद्देश आहे."अ"वर्गाचे ठेकेदार म्हणून मध्यवर्ती पी. डब्ल्यू. डी.मध्यें कंपनी दाखल आहे व कंपनीनें कित्येक कामें मिळवून चालू व पुरीं केलीं आहेत. कंपनीचें वसूल भांडवल व आगाऊ भरलेलें भांडवल सुमारें २ लक्ष रुपये आहे व ती ठेवीहि स्वीकारते. ३१ जुलै १९४३ अखेरच्या वर्षी तिला २३ हजार रुपये निव्वळ नफा झाला. त्यांतून गेल्या वर्षाचा तोटा वजा करतां नफा वाटणीसाठी १९½ हजार रुपये राहिले. भागीदारांस ६% दरानें डिव्हिडंड देण्यांत आलें. राजा पन्नालाल बन्सीलाल पित्ती हे कंपनीचे अध्यक्ष असून कर्वा आणि कं० (प्रोप्रायटरः श्री. नारायणदास रामकिसन कर्वा) हे तिचे मॅनेजिंग एजंट्स आहेत. कंपनीच्या कार्यास मुबलक वाव आहे व तिच्या डायरेक्टरांत श्रीमान्, अनुभवी व कर्तबगार लोक आहेत. या दृष्टीनें तिच्या कार्यांत उत्कृष्ट यश येण्याची अपेक्षा नमूद करणें अगत्याचें आहे.

### मुंबई प्रांतांतील ज्वारीचें व बाजरीचें पीक

मुंबई प्रांतांतील ब्रिटिश हद्दींतील खरीफ ज्वारी पिकाची लागवड १० ऑक्टोबर, १९४३ अखेर २६,९३,००० एकरांत झालेली होती. गेल्या दहा वर्षांतील सरासरी लागवडीच्या क्षेत्राचे मानानें हें क्षेत्र २४·१% मोठें आहे. गेल्या वर्षीच्या मानानें वाढ मात्र फक्त ०.५% अधिक आहे. पाऊस, कीड, इत्यादि कारणांमुळें गुजरातमधील उत्पादन मामुली उत्पादनाच्या ६८ ते ९२% होईल अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रांत ८३% व कर्नाटकांत ६७ ते ७५% उत्पादन होईल, असें दिसतें. सबंद प्रांतांतील ब्रिटिश हद्दीमधील उत्पादन (६,४३,०००) टन गेल्या दहा वर्षांच्या सरासरीच्या मानानें २६·४% अधिक व गेल्या वर्षाच्या मानानें ४·१% अधिक होईल, असा अंदाज आहे.

बाजरीखालील अंदाजी क्षेत्र ५१,८०,००० एकर म्हणजे गेल्या दहा वर्षांच्या सरासरीपेक्षा व गेल्या वर्षीपेक्षा अनुक्रमें ३४·४% व ५·१% अधिक आहे. मामुली उत्पादनाच्या ६८% ते ८३% उत्पादन गुजराथमध्यें,६७% ते ८३% महाराष्ट्रांत व ६७%ते ७५% कर्नाटकांत येईल, असें दिसतें. ब्रिटिश हद्दींतील उत्पादन (६,३०,००० टन) गेल्या दहा वर्षांतील उत्पादनापेक्षां ३२·८% अधिक परंतु गेल्या वर्षीपेक्षां ४·०% कमी होणार,अशी अपेक्षा आहे. विहिरींची खोली वाढविणें,त्या स्वच्छ करणें, इत्यादींसाठीं शेतकऱ्यांस मदत करण्यांत सरकारी योजनेंतील रकम खर्च व्हावयाची आहे.

### लायब्ररी उद्‍घाटन समारंभ

झोडगे को. ऑ. के. सोसायटी, (ता. मालेगांव, जि. नाशिक) या संस्थेच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या लायब्ररीचा उद्‍घाटन समारंभ श्री. मोतीलाल रामलाल भंडारी, कंधानें, ह्यांचे अध्यक्षतेखालीं १ जानेवारी, १९४४ रोजीं साजरा झाला. त्यावेळीं सुमारें २०० चे वर समाज हजर होता. आरंभीं श्री. पी. एस. कुळकर्णी, ग्रुप सेक्रेटरी ह्यांनीं अहवाल व ताळेबंद वाचून थोडक्यांत माहिती सांगितली. नंतर श्री. महाजन, श्री. निरंतर वगैरे वक्त्यांचीं समयोचित भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं बोधपर भाषण करून लायब्ररीस ५१ रुपये देणगी दिली व जोंपर्यंत लायब्ररी चालू आहे तोंपर्यंत अव्याहत ११ रुपये दर सालीं देण्याचें कबूल केलें. शिवाय गांवांतील सद्‍गृहस्थांकडून सदर दिवशीं एकूण रुपये १४७-८-० इतकी रकम देणगी म्हणून मिळाली. श्री. देवराव पाटील सरपंच यांनीं अध्यक्ष व आलेली मंडळी ह्यांचे आभार मानले व शेवटीं वंदनगीत व चहापान होऊन सभेचें काम संपलें.


**दत्त कंपनी**

७३५ शुक्रवार पेठ, पुणें १. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

## दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

| | | | |
|---|---|---|---|
| मुदत | ६ महिने | दर ४ | टक्के |
| | १२ „ | ४॥ | „ |
| | २४ „ | ५ | „ |

माहिती व अर्जांकरितां मॅनेजर यांस लिहा.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरीः** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रकम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

## आर्थिक नियोजन

(ले. संजय)

श्री. पुरुषोत्तमदास प्रभृतींची आर्थिक उन्नतीची योजना ५५ पृष्ठांत विस्तारलेल्या ९९ परिच्छेदांमध्यें मांडण्यांत आली आहे. हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशाच्या आर्थिक उन्नतीच्या नियोजनाची ही कल्पना अत्यंत मोजक्या पण परिणामकारक शब्दांत सुलभतेनें मांडलेली व राष्ट्राच्या विचारास जोरदार चालना देणारी आहे. राष्ट्रीय नियोजनासारखी अवाढव्य योजना यशस्वी होण्यास जनतेच्या विश्वासास पात्र असें जबाबदार मध्यवर्ती सरकार असणें अत्यावश्यक आहे ही मूलग्राही गोष्ट असंदिग्ध शब्दांत सांगून सर पुरुषोत्तमदास यांनीं, वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना योजनेची पार्श्वभूमि समजावून देत असतांना, सध्यांची राजकीय परिस्थिति सुधारेल असा आपला आशावादहि प्रगट केला.

### योजनेचा उद्देश

ही योजना परिपूर्ण नसून विचारास चालना देण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानांत आर्थिक नियोजन करतांना त्याचें ध्येय काय असावें, त्याप्रत जाण्यास मार्ग कोणते, त्याकरितां राष्ट्राला किती व कोणत्या प्रकारची किंमत द्यावी लागेल याची रूपरेषा मांडण्यांत आली असून ही देश व्यापी प्रचंड योजना प्रत्यक्ष व्यवहारांत कशी उतरवयाची याबाबतचा विचार चालू आहे व त्या प्रश्नाचें स्वतंत्र विवेचन करण्यांत येईल असें सांगितलें आहे. “आम्हीं दर्शित केलेल्या अडचणी एकवेळ योजनेची अंमलबजावणी लांबणीवर टाकूं शकतील, पण तिला यशस्वी होणेंच अशक्य करतील, असें नाहीं. आम्हांला आशा वाटते कीं आम्हीं पुढें ठेविलेला कार्यक्रम जर देशाला पटला तर योजनापूर्तीला आवश्यक तें वातावरण निर्माण करण्यास त्याचा आपोआपच उपयोग होईल.

कार्यक्रमास सुरुवात झाल्यापासून १५ वर्षांत दर माणशीं उत्पन्न आज आहे. त्याच्या दुप्पट करावें असा या योजनेचा मुख्य हेतू आहे. हिंदुस्थानांत दर माणशीं उत्पन्न इतकें कमी आहे कीं अन्न, वस्त्र व निवाऱ्याला जागा, शिक्षण व औषधपाणी या जीवनाच्या मूलभूत गरजाहि त्यांत भागूं शकत नाहींत. कृषिप्रधान हिंदुस्थानामध्यें पुरेसें खावयालाहि मिळत नाहीं, अशांचें प्रमाण भयानकपणें मोठें आहे. त्याहिपेक्षां मोठें प्रमाण योग्य प्रकारचें अन्न खावयास न मिळणारांचें आहे ! ! पोटास भरपूर अन्न नाहीं, नेसायला वस्त्र नाहीं, रहायला निवाऱ्याची जागा नाहीं, औषधपाण्याच्या नीटशा सोई नाहींत, रोगराई प्रतिबंधक उपचार अपुरे पडत आहेत, पाण्याच्या नीटशा सोई झालेल्या नाहींत, शिक्षणाकरितां पैसा नाहीं, सोईस्कर शाळा नाहींत, या सर्व बाबतींत तातडीनें सुधारणा होणें निकडीचें आहे. या सुधारणांचा उपभोग घेण्यास निदान दुपटीनें तरी दर माणशीं उत्पन्न वाढलें पाहिजे.

### उद्योगधंद्यांची वाढ

तथापि ही गोष्ट राष्ट्रीय उत्पादन, लोकसंख्येची १५ वर्षांतील वाढ लक्षांत घेऊन, तिप्पट वाढल्यासेरीज शक्य नाहीं. त्याकरितां योजना अशी:-शेतीच्या उत्पन्नांत १३० टक्के वाढ, उद्योग-धंद्यांच्या उत्पन्नांत ५०० टक्के वाढ व इतर उत्पन्नांत २०० टक्के वाढ करण्यांत यावी.

१९३१-३२च्या आकड्यांवरून उद्योगधंदे १७ टक्के, शेती ५३ टक्के व इतर २२ टक्के अशी ब्रिटिश हिंदुस्थानांतील राष्ट्रीय उत्पन्नाची वर्गवारी पडते. सुचविलेल्या योजनेप्रमाणें, हें प्रमाण अनुक्रमें ३५,४० व २० टक्के होईल. याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थान कृषिप्रधान देश राहील, पण शेतीवरील बराचसा बोजा कमी होऊन शेती व उद्योगधंदे ह्यांचेमध्यें थोडीतरी प्रमाणबद्धता निर्माण होईल.

कालवे व पाट-बंधारे बांधून, उत्तम दर्जाचें बियाणें पुरवून व सहकारी पद्धतीनें शेती करून शेतीच्या उत्पादनांत अपेक्षित वाढ होईल. देशांत वीज, लोखंड-पोलाद, यंत्रसामुग्री, रंग, खतें, रसायनें, रेल्वे इंजिनें, सीमेंट, दारुगोळा, औषधें, इत्यादि तयार करण्याचे, तसेंच रबर व इतर प्लास्टिक्सपासून निरनिराळ्या वस्तु बनविण्याचे कारखाने प्रथम काढणें अत्यावश्यक आहे. त्यांच्याबरोबरच कापड, कागद, काच, तेल व कातडीं यांचे कारखाने वाढविले जातील.

शेतीच्या व औद्योगिक उत्पादनांत वाढ झाल्यानें वहातुकीच्या प्रश्नास महत्त्व येतें. त्याकरितां २१,००० मैल रेल्वे रस्ते आणि ३००,००० मैल इतर वहातुकीचे रस्ते नवीन बांधावे लागतील. तसेंच बंदरांत मालाच्या चढ- उताराच्या अधिक सोई करण्यांत येतील.

### योजनेच्या खर्चांची तरतूद

योजनेच्या खर्चाची वाटणी खालीलप्रमाणें सुचविण्यांत आली आहे.

| | | |
|---|---|---|
| कारखाने | रु. ४,४८० | कोटी |
| शेती | १,२४० | ,, |
| वहातूक | ९४० | ,, |
| शिक्षण | ४९० | ,, |
| आरोग्य | ४५० | ,, |
| घर बांधणी इ० | २,२०० | ,, |
| इतर | २०० | ,, |
| | रु. १०,००० | |

ह्या खर्चांची तोंडमिळवणी अशी

| | | |
|---|---|---|
| सांठवलेलें गुप्त धन रु. | ३०० | कोटी |
| स्टर्लिंग रोखे | १,००० | ,, |
| आयात-निर्गतींतील अनुकूल तफावत | ६०० | ,, |
| परदेशीं कर्ज | ७०० | ,, |
| बँका वगैरेंतील शिल्लक | ४,००० | ,, |
| निर्माण केलेलें चलन | ३,४०० | ,, |
| | रु. १०,००० | |

वर सुचविलेल्या मार्गानें अपेक्षिलेला पैसा मिळेल किंवा नाहीं, तसेंच सरकारी पतीवर नवीन पैसा उभारणें कितपत श्रेयस्कर होईल याबाबत शंका घेणाऱ्यांना उत्तर असें आहे कीं “राष्ट्राच्या आर्थिक जीवनाचा पैसा हा देव नसून दास आहे.” राष्ट्राची खरी संपत्ति देशांतील उपलब्ध साधनसामुग्री व मानवी शक्ति ही असून त्यांचा विशिष्ट प्रकारें उपयोग करून घेण्याचें पैसा हें एक साधन आहे. राष्ट्रीय संपत्ति वाढविण्याच्या प्रयत्नांत मुद्दाम निर्माण केलेलें चलन वापरण्यांत कांहीं चूक नाहीं.”

## खडा मारायचां झाला तर!

★ ★ ★

पाणवठ्यावरून परत येणाऱ्या ह्या घागरवालीचें प्रेमगीत पुणेकरांस अक्षरशः वेड लावील !



प्रकाश पिक्चर्सचा

# प न घ ट

भूमिकाः—रत्नमाला, उमाकांत, जीवन

## ग्लोब पुणें, येथें

येत्या शनिवारीं सुरूं होणार !

—१३ वा आठवडा—

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

# रामराज्य

दिग्दर्शकः—विजय भट्ट.

भूमिकाः—शोभना, समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी.

## मिनर्व्हा, पुणें

रोज फक्त दोन खेळ

६॥ व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व इतर सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां

रॉयल रत्न १८ वें मराठी भाषेंत

# महात्मा ★ विदुर

दिग्दर्शकः—रेजिसॉर पार्श्वनाथ आळतेकर

कलाः—बाबुराव पेंटर

भूमिकाः—कै. विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे, मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद, सीता जव्हेरी.

## पुण्यांत ७ वा आठवडा

## आर्यन, पुणें

दररोज तीन खेळ

३। ६॥ व १० वाजतां

दर रविवारीं सकाळीं १० वा.

रिझर्व्हेशन सकाळीं १० ते १२ दुपारीं ३ चे पुढें.

तिकिटांचे दर—( सरकारी करासह ) बॉक्स रु. १॥१२. फर्स्ट क्लास रु. १, फॅमिलीसर्कल आ. १०, सेकंड क्लास ९ आणे, इंटर क्लास ५ आ. थर्ड क्लास ४ आणे. कुलीन स्त्रिया १० आ. व ५ आ.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि वर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.